# दि. 22 फेब्रुवारी 2025 च्या प्रेस नोट चे शुधीपत्रक

दि. 21 फेब्रुवारी बीबीसी वृत्तचित्रवाहिनीव्दारे प्रसिध्द मिडीया रिपोर्टमध्ये ट्रामाडोल आणि केरेसोप्रोडॉल कॉम्बिनेशन यासारख्या ओपीओइड्स भारतामध्ये उत्पादित केल्या जात असून त्या नायजेरिया, घाना इ. आफ्रिकन देशांमध्ये निर्यात केल्या जातात. त्याठिकाणी त्यांचा गैरवापर केला जातो.

या रिपोर्टमध्ये महाराष्ट्र राज्यातील 'एव्हिओ (Aveo)' या औषध निर्मात्या कंपनीचे स्टिंग ऑपरेशन करण्यात आल्याचे दर्शविण्यात आले असून ती कंपनी आफ्रिकन देशामध्ये या औषधाची निर्यात करण्याच्या प्रक्रियेत सहभागी आहे.

बीबीसीच्या रिपोर्टच्या अनुषंगाने त्वरित कारवाई करीत भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या औषध निरीक्षकांच्या संयुक्त पथकाने सदर कंपनीच्या कारखान्यावर व स्टोरेज गोदामावर छापा टाकला असून सर्व साठा जप्त केला आहे. त्याचप्रमाणे पुढील उत्पादन प्रक्रिया थांबवून मनाई केली आहे.

औषध आणि सौंदर्य प्रसाधने कायदा 1940 अंतर्गत सदर कंपनीस यापूर्वीच कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

या कारवाईमध्ये कोणत्याही प्रकारचा विलंब न करता आणि कोणतीही भीती न बाळगता नि:पक्षपातीपणे कायदेशीर कठोर कारवाई करण्यात येईल.

भारत सरकारने दि. 21 फेब्रुवारी रोजी सर्व राज्यांना निर्यात विषयक ना हरकत प्रमाणपत्र आणि टॅपेंटाडेल व केरेसोप्रोडॉल मान्यता नसलेले सर्व कम्बिनेशन्स च्या सर्व उत्पादनांची निर्मिती करण्याची परवानगी मागे घेण्याचे निर्देशित दिले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासनाने या पूर्वीच कारवाई करण्यास सुरूवात केलेली आहे.

महाराष्ट्र शासन हे भारत सरकारच्या समन्वयाने अशा प्रकारे देशाची आणि राज्याची बदनामी करणा-या सर्व विघातक कार्य करणा-या घटकांवर कारवाई करण्यासाठी सज्ज आहे.

अन्न व औषधे प्रशासनाच्या आयुक्तांना भारत सरकारच्या निर्देशानुसार त्वरित कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.